**जळगाव शहर पोलीस स्टेशन कार्यालय जिल्हा - जळगाव (महाराष्ट्र)**
**दुरध्वनी क्रमांक - ०२५७/ २२२९६९३**
**pstn.city@gmail.com**

**प्रेस नोट**

जळगांव शहर पोलीस स्टेशन
दिनांक ३१ /०३ /२०२६

प्रति.
**मा.संपादक सो.**

---

**विषय - जळगांव शहर पोलीस गुन्हे शोध पथकाची उल्लेखनीय कामगीरी घरफोडी चोरी करणारे अट्टल चोरटे जेरबंद**

मा.पोलीस अधीक्षक श्री माहेश्वर रेड्डी सो.आदेशान्वये जळगांव जिल्हयातील घरफोडी चोरी गुन्हयामध्ये वाढ होत असल्याने मा.अप्पर पोलीस अधीक्षक सो.अशोक नखाते यांनी उप विभागीय पोलीस अधिकारी श्री.नितीन गणापुरे सो.यांनी जळगांव शहरातील शहर पोलीस स्टेशन येथील गुन्हे शोध पथकातील कर्मचारी यांची बैठक घेवुन त्यांना मार्गदर्शन करुन घरफोडी चोरीचे जास्तीत जास्त गुन्हे उघडकीस आणणे बाबत सुचना दिल्या त्यानुसार मा. पोलीस निरीक्षक सागर शिंपी सो.नेम जळगाव शहर पो.स्टे. यांनी गुन्हे शोध पथकातील स.पो.नि.सुरेश आव्हाड, सफौ/ सुनिल पाटील,पोहेकॉ.उमेश भांडारकर,पोहेकॉ/ सतिष पाटील ,पोहेकॉ विरेंद्र शिंदे,पोहेकॉ योगेश पाटील,पोहेकॉ भगवान पाटील,पोहेकॉ नंदलाल पाटील ,पोहेकॉ दिपक शिरसाठ, पोकॉ.अमोल ठाकुर पोकॉ.राहुलकुमार पांचाळ, पोकॉ प्रणय पवार अशांचे पथक तयार करुन सदर पथकास घरफोडी चोरीचे गुन्हे उघडकीस आणने बाबत योग्य त्या सुचना दिल्या.

दिनांक २३ /०३ /२०२६ रोजी ते दिनांक २५ /०३ /२०२६ दरम्यान जळगांव शहरातील बि.नं.४२ रुम नंबर २१ गेंदालालमिल येथे शेख रईस शेख यांचे राहते घरातुन १)४००/- रु कि च्या १ भाराच्या चार चांदीच्या अंगठ्या २) १०,०००/- रु त्यात ५०० रु दराच्या २० नोटा असलेले रोक रक्कम असे एकुण १०,४००/- रक्कम घरफोडी चोरी झालेली होती त्याबाबत त्यांनी जळगांव शहर पो स्टे येथे गुरन ८३/२०२६ भा न्या सं कलम - ३०५ (अ),३३१(३) ३३१(४) अन्वयेचा गुन्हा दाखल केलेला होता त्या अनुषंगाने सदर गुन्ह्याचा तपास चालु असतांना गुप्त बातमीदारां मार्फत माहीती प्राप्त झाली की,सराईत गुन्हेगार १)आदील शेख मजीद २)गुफरान शेख करीम ३)कासिम सैय्यद अली सर्व रा.गेंदालालमिल,जळगांव यांनी घरफोडी चोरी केली असुन सदर आरोपीत हे गेंदालालमिल भागात डॉ. आंबेडकर रिक्षा स्टॉपकडे असल्याची माहीती प्राप्त झाल्याने सदर आरोपीतांचा शोध घेतला असता ते मिळुन आल्याने त्यांना ताब्यात घेवुन पोलीस ठाणे येथे पोलीस निरीक्षक सो. यांचे समक्ष हजर केले त्यांना विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी घरफोडी चोरी केल्याची कबुली दिल्याने त्यांना नमुद गुन्ह्यात अटक केली असुन सदर आरोपीकडुन १)१०,०००/- रु रोख त्यात ५०० रु दराच्या २० भारतीय चलनी नोटा २)४००/- रु कि च्या ११.९७० ग्रॅम वजनाच्या ४ चांदीच्या अंगठ्या ३)५,५००/- रु कि च्या ९७.८१० ग्रॅम वजनाच्या चांदीच्या पायातील पैंजण ३ नग४)१४,०००/- रु कि ची १.९७० ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी असा मुद्देमाल हस्तगत केला आहे.सदर आरोपीतांनी जळगांव शहर पो स्टे गुरन २७ /२०२६ भा न्या सं क ३०५ (अ),३३१ (३),३३१ (४) या गुन्ह्यात घरफोडी चोरी केल्याची कबुली दिल्याने त्यांच्याकडुन मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. जळगांव भाग जळगांव मधील जळगांव शहर पो.स्टे.कडील ०२ गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस अधीक्षक सो.श्री माहेश्वर रेड्डी सो. मा. अप्पर पोलीस अधीक्षक सो. अशोक नखाते उप विभागीय पोलीस अधिकारी श्री.नितीन गणापुरे सो. मा.पोलीस निरीक्षक सागर शिंपी यांचे मार्गदर्शनाखाली जळगांव शहर पो.स्टे.च्या गुन्हे शोध पथकातील स.पो.नि.सुरेश आव्हाड, सफौ/ सुनिल पाटील,पोहेकॉ.उमेश भांडारकर,पोहेकॉ/सतिष पाटील ,पोहेकॉ विरेंद्र शिंदे,पोहेकॉ योगेश पाटील, पोहेकॉ भगवान पाटील,पोहेकॉ नंदलाल पाटील,पोहेकॉ दिपक शिरसाट, पोकॉ. अमोल ठाकुर, पोकॉ.राहुलकुमार पांचाळ,पोकॉ.प्रणय पवार अशांनी केली आहे.


जळगाव शहर पोलीस स्टेशन गु.र.नं.